# पनवेल महानगरपालिका

*ता.पनवेल, जि.रायगड*

**कार्यालय :-** आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१० २०६ दूरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id : panvelcorporation@gmail.com

**जा.क्र.पमपा/मुख्यालय/कोरोना/२०२०/आदेश क्र. ३६** **दिनांक :- १७/०४/२०२०**

**वाचले :-**

१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्र. करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य-०५/, दिनांक १४/०३/२०२०
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र. करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य-०५/, दिनांक १४/०३/२०२०
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४.
४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६.
५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
६. महाराष्ट्र कोव्हिड -१९ उपाययोजना नियम, २०२०.

## आदेश

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणू(कोविड-१९) रोखण्यासाठी राज्यात साथ रोग अधिनियम कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० रोजी लागू केला आहे. त्याबाबत उपोद्घातील क्रमांक ०१ मधील अधिसूचना लागू करण्यात आली आहे.

ज्याअर्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणूचे संसर्ग बाधित रुग्ण आढळून येत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत विमान प्रवास केलेले अनेक प्रवासी विविध भागांत आलेले आहेत. असे काही प्रवासी पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये आलेले आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा संसर्ग असलेल्यात अधिक वाढ होऊ न देता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे कोरोना विषाणू संसर्ग पनवेल महानगरपालिका क्षेत्रात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गर्दीची ठिकाणे जाणे, वास्तव्य करणे इत्यादी बाबी टाळणे आवश्यक आहे.

त्याअर्थी कोरोना विषाणू (कोविड-१९) रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ लागू करून त्यातील खंड ०२, ०३ व ०४ मधील अधिसूचना निर्गमित केल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील **तक्का गाव** येथे ०२ व्यक्ती कोरोना विषाणू बाधित आढळून आल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील **तक्का गाव** त्या

आजूबाजूचा परिसर यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सदर क्षेत्र ' कंटेन्मेंट झोन ' म्हणून जाहीर करण्यात येत आहे. कोरोना विषाणू बाधित क्षेत्र काळ्या रंगाने सदरची हद्द कायम केली आहे. संबंधित नकाशा सोबत जोडलेला आहे. या नकाशातील दाखविलेल्या हद्दीप्रमाणे कंटेन्मेंट झोनची मर्यादा राहील. सदर परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी घरातून बाहेर पडण्यास व अन्य ठिकाणी स्थलांतर करण्यात तसेच बाहेरून येणाऱ्या लोकांना सदर बाधित क्षेत्रात प्रवेश करण्यास मी गणेश देशमुख आयुक्त, पनवेल महानगरपालिका या आदेशाद्वारे प्रतिबंध करीत आहे.

तरी अशा प्रकारचा प्रतिबंध लागू असल्याबाबत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील **तक्का गाव** व आजूबाजूच्या परिसरातून येणाऱ्या गाव व तेथील सर्व शासकीय कार्यालये, सर्व ठिकाणे येथे लेखी आदेश लावून तसेच दवंडी देऊन प्रभाग अधिकारी यांनी या झोनबाबत प्रसिद्धी देणे.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास आपत्ती व्यवस्थापन कलम २००५ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ , भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनिय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

**(गणेश देशमुख)**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

प्रत-

१. मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीस्तव.
२. मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग.
३. पोलीस उप आयुक्त झोन -०२ यांना पुढील कार्यवाहीस्तव.
४. पोलीस सहाय्यक आयुक्त,पनवेल यांना पुढील कार्यवाहीस्तव.
५. उप विभागीय आयुक्त, पनवेल.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड -अलिबाग.
७. जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग.